CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २३ फेब्रुवारी २०२१**

**सिडकोच्या सानपाडा, कळंबोली आणि कोपरखैरणे येथील निवासी आणि निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांना प्राप्त झाले उच्चांकी दर**
**८ भूखंडांच्या विक्रीतून प्राप्त झाला ४१५ कोटींचा महसूल**

सिडको महामंडळातर्फे ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रियेद्वारे सानपाडा, कळंबोली व कोपरखैरणे येथील एकूण ०८ निवासी आणि निवासी तथा वाणिज्यिक भूखंडांच्या भाडेपट्ट्यावर विक्री योजनेस निविदाकारांचा उत्तम प्रतिसाद लाभून सदर भूखंडांना विक्रमी दर प्राप्त झाला आहे. यामधील सानपाड्यातील सेक्टर १८ मधील २ भूखंडांना रू. २,५२,०००/- प्रति चौ. मी. व रु. २,४३,०००/- प्रति चौ. मी. तर सेक्टर १९ मधील २ भूखंडांना रु. २,४१,९८९ प्रति चौ. मी. व रू. २,३२,४६८/- प्रति चौ. मी. असे उच्चांकी दर प्राप्त झाले आहेत. या भूखंडांसह योजनेतील उर्वरित ०४ भूखंडाच्यां विक्रीतून सिडकोला अंदाजे रू. ४१५ कोटींचा महसूल प्राप्त झाला आहे.

योजना पुस्तिकेतील वेळापत्रकानुसार संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पडून २३ फेब्रुवारी २०२१ रोजी ऑनलाईन माध्यमातून ई-निविदा उघडण्यात आल्या व ई-लिलाव प्रक्रियेमधील बोलींची तुलना करण्यात येऊन यशस्वी निविदादारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत.

सदर योजनेंतर्गत सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील सानपाडा येथील सेक्टर-१८ मधील २ व सेक्टर-१९ मधील २, कळंबोली येथील सेक्टर-१६ई मधील ३ आणि कोपरखैरणे येथील सेक्टर-४ मधील १ असे एकूण ०८ भूखंड भाडेपट्ट्यावर विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर भूखंड हे निवासी आणि निवासी तथा वाणिज्यिक वापराकरिता उपलब्ध होते.

ई-लिलाव व ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा, निविदा भरणे या सर्व प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व जलद अशा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आल्या. यामध्ये ऑनलाईन माध्यमातून बंद निविदा सादर केल्यानंतर अर्जदरांना पुढील टप्प्यातील ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार होते.

बंद निविदेमध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली किंवा ई-लिलावामध्ये उद्धृत करण्यात आलेली बोली यांपैकी जी बोली जास्त रकमेची असेल ती बोली स्वीकारण्याचा निकष निश्चित करण्यात आला होता.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**